# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१८५** **दिनांक - ११/०५/२०२४**

## मोटार सायकल चोरी करुन, त्यावरुन चैन स्नॅचींग करणाऱ्या सराईत चोरटयास गुन्हे शाखा, कक्ष -२ वसई यांना पकडण्यात यश

माणिकपुर पोलीस ठाणेचे हद्दीत दिनांक ०१/०५/२०२४ रोजी पहाटे ०७.२० वा.चे सुमारास गुन्हयातील फिर्यादी श्रीमती रेनिता विजय शिवडवकर, वय ५६ वर्षे, व्यावसाय- गृहिणी, रा. फ्लॅट नं. ०५, बिल्डिंग नं. एन ०२, डायस ॲन्ड परेरा नगर, लॉरेन पार्क, नायगाव प. ता. वसई, जि. पालघर या नायगाव पश्चिम या रेल्वे स्टेशनकडुन विजय परेरा नगरकडे पायी चालत जात असताना नायगाव पोलीस चौकी फळाच्या हात गाडी दुकाना समोर आल्या असता त्यांच्या पाठीमागुन उजव्या बाजुने जाणा-या एका मोटार सायकल स्वाराने अचानकपणे फिर्यादी यांच्या मानेवर हात मारुन फिर्यादी यांच्या गळ्यातील अंदाजे ७५,०००/- रुपये किंमतीची १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरजस्तीने खेचुन चोरी पळुन गेला असल्याबाबत गुन्हयातील फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.रजि.नं. १४५/२०२४ भादविसं कलम ३९२ प्रमाणे दि. ०१/०५/२०२४ रोजी १२.३७ वा. गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा दाखल झाल्याची माहीती प्राप्त होताच तात्काळ मा. वरीष्ठांचे आदेशाने सदर गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून युनिटचे अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन आरोपीत याने चोरी करणेकरीता वापरलेल्या स्कुटीचा सी सी टी व्ही कॅमेरांचे फुटेज परिक्षणाव्दारे चोरटयाचा पळुन जाण्याचा मार्ग काढण्यात आला. पोलीसांना गुंगारा देणेकरीता आरोपीत चोरटा हा गुन्हा करुन वसई, विरार, नालासोपारा परिसरात वारंवार फिरत असल्याने सदर आरोपीताचे फिरण्याच्या मार्गाचा सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेजचे परीक्षण करत असताना नमुद गुन्हयात वापरण्यात आलेल्या वाहनाचा नंबर एम एच ४८ बी बी ७३८६ हा नंबर प्राप्त केला. त्यावरुन गाडी मालकाचा शोध घेतला असता गाडी मालक यांनी त्यांची मोटार सायकल ही दिनांक ३०/०४/२०२४ रोजी सकाळी ०५.०० वा नायगांव पश्चिम रेल्वे स्टेशन जवळ पार्क करुन ते कामावर मुंबई येथे गेले असता ती कोणी तरी चोरटयाने चोरी केल्याचे सांगीतले. माणिकपुर पोलीस ठाण्यात माहीती घेतली असता सदर बाबत माणिकपुर पो स्टे गु रजि नं. १५१/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद केलेला आहे. आरोपीत याने नमुद मोटार सायकल ही चोरी करुन तिने चैन स्नॅचींग केल्याचे निष्पन्न झाले. आरोपीत याचा जाण्या-येण्याचा मार्गाचा शोध घेत असताना नालासोपारा रेल्वे स्टेशन मधील सीसीटिव्ही मध्ये आरोपीत दिसुन आला म्हणुन नालासोपारा पुर्व परीसरात स्टाफ सह गुन्हेगार वॉच पेट्रोलींग केली.तसेच सदर परीसरातील गुप्त बातमीदार यांचे कडुन सीसीटिव्ही मधील आरोपीत यांचे फोटो दाखवुन शोध घेतला असता आरोपीत हा चोरीच्या मोटार सायकल सह फिरत असताना नालासोपारा पुर्व अग्रवाल फायर ब्रिगेट जवळ मिळुन आल्याने त्यास चोरीच्या मोटार सायकल सह ताब्यात घेण्यात आले आहे.

**ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीताचे नाव :-**

आरीफ याकुब शेख वय २८ वर्षे, रा.अग्रवाल, फोर्थ रोड, क्रिकेट टर्फच्या बाजुला असलेल्या रुम मध्ये, लिंक रोड, नालासोपारा पुर्व.

**-: आरोपीत याचे कडुन उघडकीस आलेले गुन्हे :-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजी नं. |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं १४५/२०२४ भादविस कलम ३९२ प्रमाणे |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं १५७/२०२४ भादविस कलम ३९२ प्रमाणे |
| ३. | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं १५१/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | तुळींज पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं २७१/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |

## अटक आरोपीची पार्श्वभूमी :-

तसेच नमुद अटक आरोपीत याचे विरोधात जबरी चोरी, वाहनचोरी सारखे १३ गुन्हे नोंद असून तो गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेला सराईत गुन्हेगार आहे. त्याचे विरोधात यापुर्वी खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गु. रजि. नं. | कायदा व कलम |
|---|---|---|---|
| १ | वसई रोड रेल्वे पोलीस ठाणे | ५१६/२०२३ | भादविस ३७९,४११,३४ प्रमाणे |
| २ | वसई रोड रेल्वे पोलीस ठाणे | ५६०/२०२३ | भादविस ३७९ प्रमाणे |
| ३ | वसई रोड रेल्वे पोलीस ठाणे | ५८५/२०२३ | भादविस ३७९ प्रमाणे |
| ४ | वसई रोड रेल्वे पोलीस ठाणे | १७५/२०२० | भादविस ३७९ प्रमाणे |
| ५ | बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे | ४०८१/२०१८ | भादविस ३९२ प्रमाणे |
| ६ | बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे | १०१६/२०२३ | भादविस ३७९ प्रमाणे |
| ७ | बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे | ६७२/२०२३ | भादविस ३७९ प्रमाणे |
| ८ | बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे | ६७३/२०२३ | भादविस ३७९ प्रमाणे |
| ९ | बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे | ११२/२०२१ | भादविस ३७९ प्रमाणे |
| १० | बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे | ११५/२०२१ | भादविस ३७९ प्रमाणे |
| ११ | बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे | ११४/२०२१ | भादविस ३७९ प्रमाणे |
| १२ | दहिसर पोलीस ठाणे | ११५/२०२१ | भादविस ३७९ प्रमाणे |
| १३ | माणीकपुर पोलीस ठाणे | १०९/२०२३ | भादविस ३७९ प्रमाणे |

नमुद गुन्हयातील आरोपीत याचेकडुन तपासा दरम्यान चैन स्नॅचिंगचे २ गुन्हे, तसेच वाहन चोरीचे २ गुन्हे उघडकीस आणुन नमुद गुन्हयात चोरी करणेकरीता वापरलेल्या मोटार सायकल सहीत दोन मोटार सायकल तसेच गुन्हयात चोरीस गेलेले १० ग्रॅम सोन्याचे दागिने असा १,१०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सहाफौज/रमेश भोसले, सहाफौज/संजय नवले, पोहवा/०००१५ रविंद्र पवार, पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील, पोहवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पोहवा/०५०३३ जगदिश गोवारी, पोहवा/०६१०७ रमेश आलदर, पोहवा/१२०४७ दादा आडके, पोहवा/१२०५३ सुधीर नरळे, पोना/०३०३२ प्रशांत ठाकुर, पोशि/१२०९७ अमोल कोरे, पो कॉ/राज गायकवाड, पो कॉ/ प्रतीक कोडगे, पो कॉ/अजीत मैड, मसुब- रामेश्वर केकान, मसुब/ अविनाश चौधरी यांनी उत्कृष्टपणे पार पाडली आहे.

